* जय हिंदमाता *

शाहीरी-अंक १

१६२

# रंगाचा पोवाडा १३ वा.

लेखकः-कविभूषण महाराष्ट्र शाहीर प्रल्हादराय जामखेडकर.

द्वापारामधें रंग खेळला कृष्ण सखा भरजोमात। तसी धुमाधार केली पुण्यामंधी रंग खेळले श्रीमंत ॥धृ॥ पुण्यासारखे दुजे शहर नाहीं जगतात। पेशवाई कारभारात। रणमर्द नाम ख्यात। लढवैय्ये अती यशवंत। पाटीलबाबा त्यात प्रख्यात ॥ पाटील बाबा शूर शिपाईखंदा दरबारात। यवनावर केली मात। थरथरा कापे हृदयात। अधिकार आणले दरोबस्त। मोंगलावर बसवूनी गस्त। दरबारी हजर होते सारे उमराव। म्हणे सावाई माधवराव। अैकाअैका तुम्ही राव। रंग खेळू वाटे चित्तात। पाटील बाबा आणा ध्यानात। पाहून मर्जी केली अर्जी अती अदरात। शिंदे बोले हुजूरात। आज्ञा व्हावी दरबारात। तैयार व्हावे अवघे दरोबस्त। रंग खेळू पुणे शहरात ॥ कळ पाहून मर्जीचा रुकार दिला त्यास। हौदे ठेवूनी शहरात। रंग भरा पुरा त्यात। गुलाल गोंटे ठेवा चौकात। पुणे शहरी रंगाची मात ॥ मध्ये मुख्य अंबारी राजशाही थाट। मागे स्वाऱ्या दाट। यश वर्णीताती भाट। चंद्राला शोभा ताऱ्यांत। शोभती तसे श्रीमंत ॥ झाली गर्दी रंगाची अेकचमार। धुमाधार अनिवार। पिचकाऱ्यांचा भडीमार। चाली स्वारी शनवार वर्जून। पुढें चालले पेठेपेठेतून ॥ घरोघरी नारी सजल्या उभ्या झुरुक्यात। गुलाल गुर्दी बहारात। रिचविति रस्त्यांत। मुजरे राहीले रंगदंगात। शोभती शिपाई वृंदात ॥ शहरामध्यें शहर पुणे अती गुलजार। त्यात पेठ रविवार। हरीपंत दीलदार। कृष्ण शोभे त्यात श्रीमंत। यादवांचा संगे परीवार ॥ हरीपंत उडविती रंग जोरदार। केशरी अनिवार। तोंड चुकवि वारंवार। रुफेत राहिला नाही रस्त्यात। रंगाचे वाहिले पाट ॥ तकतराव जिलेवंत नाचे आनंदात। शके सत्तराशे चौदात। परिधावी संवत्सरात। नाना फडणीस रंगले रंगात। भरून गेले सारे घरदार ॥ कुल दीपक पाटील बाबा गुणी सुगरात। पराक्रमी सरदारांत। मुगुटमणी सर्वांत। तलवार बहाद्दर झेंडे मुलखात। फडकती झेंडे अदरात ॥ पाटील बाबा घेऊन गेले मग शिबिरात। रंग आला हो रंगात। भरघोस सारा थाट। वस्त्रे देऊन केला सन्मान। ज्याचा त्याचा ठेवून मान ॥ चंद्रजोती लावून स्वारी आली शहरात। मुजरे होताती वाड्यांत रंग भरे पोवाड्यात। प्रल्हाद रायाचे अेकतां कवन। गुणीजन गाती गुणगान ॥

(रा. प्रे. ज.) समाप्त